# महाराष्ट्र शासन

**ई-मेल/तात्काळ**
Email ID- doesttclass२.wrd@maharashtra.gov.in

क्रमांक: एसएलएस-२०२१/२५५/२१/आ.(वर्ग-२)
जलसंपदा विभाग,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०८ जून, २०२२

प्रति,

मुख्य अभियंता (विद्युत),
जलविद्युत प्रकल्प,जलसंपदा विभाग,
हॉंगकॉंग बॅंक इमारत, ४ था मजला,
महात्मा गांधी रोड, फोर्ट,मुंबई- ४०० ००१.

**विषय**:- उप अभियंता (विवयां) संवर्गाची सन २०२१-२२ ची निवडसूची तयार करणेबाबत...
**संदर्भ**:- सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्रमांक-एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.४९/कार्या.१२, दिनांक १४.०७.२०२१

उप अभियंता (विवयां) या पदावर पदोन्नती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सन २०२१-२२ च्या निवडसूचीमध्ये, सोबतच्या विवरणपत्र-अ मध्ये नमूद केलेल्या सहायक अभियंता श्रेणी-२ व कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता (विवयां) यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

२. संदर्भाधीन शासन अधिसूचनेन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या “महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित)” पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम, २०२१”, दिनांक १४.०७.२०२१ मधील तरतूदीनुसार उप अभियंता (विवयां) संवर्गाची खालील विवरणपत्रात दर्शविलेली महसूली विभागनिहाय दिनांक ३०.०६.२०२२ रोजी रिक्त असलेली/ संभाव्य रिक्त पदे विभागीय सवंर्ग वाटपासाठी विचारात घेतली जाणार आहेत.

### उप अभियंता (वि.व यां.) संवर्गातील रिक्त पदे

| अ.क्र. | विभागाचे नाव | पदांची संख्या | अ.क्र. | विभागाचे नाव | पदांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | नागपूर | ८ | ५ | नाशिक | ४ |
| २ | अमरावती | ३ | ६ | कोकण-२ (ठाणे, मुंबई उपनगर, मुंबई शहर, रायगड) | ५ |
| ३ | औरंगाबाद | ४ | ७ | पुणे | १७ |
| ४ | कोकण-१ (पालघर, रत्नागिरी, सिंधुदूर्ग) | २ | -- | -- | -- |

३. उक्त तक्त्यात दर्शविलेली रिक्त पदे विचारात घेऊन विवरणपत्र “अ” मध्ये नमूद अभियंत्यांनी त्यांचे सोईनुसार यासोबत जोडलेल्या “नमुना-ब” मध्ये विभागीय संवर्गासाठीचा पहिला पसंतीक्रम मंगळवार, दिनांक १४.०६.२०२२ पर्यंत शासनास सादर करावा. जे अभियंते विहित मुदतीत विकल्प देणार नाहीत, त्यांचा महसूली संवर्ग शासन स्वत: नियमाप्रमाणे वाटप करेल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

४. "विवरणपत्र-अ" मध्ये नमूद अभियंत्यांना असेही सूचित करण्यात येते की, जरी २०२१-२२ च्या निवडसूचीमध्ये आपल्या नावाची शिफारस झाली तरी आपणांस उप अभियंता (विवयां) या पदावर पदोन्नती मिळेल, याची ग्वाही देता येत नाही. आपण ज्या विभागीय संवर्गाचा विकल्प देणार आहात, त्याचे आपणांस वाटप होईलच असेही नाही. तसेच वर नमूद रिक्त पदे महसूल संवर्ग वाटप नियमांच्या तरतुदीनुसार भरण्यात येतील, याची कृपया नोंद घ्यावी .

५. महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूली विभाग वाटप नियम, २०२१ मधील नियम ७ च्या तरतूदी विवरणपत्र-अ मध्ये दर्शविलेल्या अभियंत्यांना लागू असतील, तर त्यांची माहिती शासनास उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच अभियंत्यांना लागू नसेल अशी माहिती "निरंक" कळवावी.

६. राज्य संवर्गातील उप अभियंता (विवयां) पदावर पदोन्नतीसाठी शिफारस केलेल्या सहायक अभियंता श्रेणी-२/कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता (विवयां) यांचा महसूली संवर्ग पसंतीक्रम (विकल्प नमुना-ब) व परिच्छेद क्र.५ मध्ये नमूद केलेल्या माहितीसह शासनास खास दूतामार्फत मंगळवार, दिनांक १४.०६.२०२२ पर्यंत सादर करावा.

हे पत्र जलसंपदा विभाच्या www.wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून या पत्राची प्रत संबंधितांनी प्राप्त करुन घेवून पुढील कार्यवाही तात्काळ करावी.

(बा. रा. सोनवणे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्र : विवरणपत्र "अ" व बंधपत्र-"ब"

प्रत :- आ (वर्ग-२ ) कार्यासन संग्रहार्थ.

# विवरणपत्र-अ

पदवीधर गट

सहायक अभियंता श्रेणी-२ (विवयां)

| अ.क्र. | जेष्ठता क्रमांक | सहायक अभियंता श्रेणी-२ (विवयां) यांचे नांव | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | ३९ | श्रीमती शितल बाबुराव बडगिरे | इमाव |
| २ | ४१ | श्रीमती भूमिका सुनिल तिडके | भ.ज.-क |
| ३ | ४३ | श्री. निखिल सुरेश बमनोटे | भ.ज.-ब |
| ४ | ४६ | श्री. महेश भिमराव सुर्वे | अ.ज. |

पदविकाधारक गट

कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता (विवयां)

| अ.क्र. | जेष्ठता क्रमांक | कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता (विवयां) यांचे नांव | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | ९५ | श्री. राजेंद्र बनकर गायकवाड | खुला |
| २ | ९६ | श्री. रमेश बाबासो पाटील | खुला |
| ३ | ९७ | श्री. अनिल पांडुरंग कुलकर्णी | खुला |
| ४ | ९८ | श्री. राजेंद्र दत्तात्रय वाणी | खुला |
| ५ | ९९ | श्रीमती विद्या सुरेश पाटील | खुला |
| ६ | १०० | श्री. भरत सुकदेव पाटोळे | अ.जा. |

## सोबतचा नमूना "ब" (बंधपत्र) (पदोन्नतीने नियुक्तीसंदर्भात)

मी,श्री./श्रीमती/कुमारी...................................................................... याद्वारे असे लिहून देतो /देते की, माझा ............................................ पदावर पदोन्नतीसाठीच्या निवडसूचीत / तात्पुरत्या पदोन्नती सूचीत समावेश असल्याचे मला क्रमांक ........................................................................दिनांक .............................. च्या पत्रान्वये कळविले आहे. सदर महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदावर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियमावली, २०२१ लागू असून माझी .................................................... पदावर पदोन्नतीने नियुक्ती झाल्यावर या नियमावलीतील तरतूदी मला लागू होणार आहेत.

सदर नियमावलीतील तरतुदींच्या अनुषंगाने मी ............................................... पदावर पदोन्नतीने नियुक्तीनंतर माझा पहिला पसंतीक्रम #............................................ या विभागीय संवर्गासाठी देत आहे.

ठिकाण:

दिनांक : (सही)

(नाव)

# (१) नागपूर (२) अमरावती (३) औरंगाबाद (४) कोकण-१ (पालघर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग) (५) नाशिक (६) कोकण-२ (मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे व रायगड) (७) पुणे यापैकी कोणताही एक पसंतीक्रमानुसार विभागीय संवर्ग नमूद करावा.

पदोन्नतीच्या विचारक्षेत्रात असलेल्या अधिकाऱ्यांना खालील नमूद बाब लागू असल्यास त्यासमोर (✔ ) अशी खुण करावी.

१) जे अधिकारी स्वत: अपंग आहेत.
२) ज्या अधिकाऱ्याचा जोडीदार (पती / पत्नी) किंवा मूल मतिमंद आहे किंवा ज्या अधिकाऱ्याच्या मतिमंद असलेल्या भावाचे किंवा बहिणीचे पालकत्व स्विकारले आहे.
३) कायदेशीर कागदपत्राद्वारे एकल पालकत्व सिध्द झालेले अधिकारी
४) दिनांक १९.०१.२०२५ पूर्वी सेवानिवृत्त होणारे अधिकारी